**वस्त्रोद्योग धोरण२०११-२०१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत वितरित करणेबाबत**

**जिमाटेक्स इंडस्ट्रिज प्रा.लि.हिंगणघाट,जि.वर्धा**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक बैठक २०१५/प्र.क्र.१२७/टेक्स-५**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ८ जुलै, २०१५**

**वाचा** :-१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.२/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२

२. शासन शुध्दीपत्रक समक्रमांक, दिनांक १२ मार्च, २०१२ आणि दिनांक ८ मे, २०१३.

३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.२५७/टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४

४. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे क्र. 4689 , दि. 28 एप्रिल 2015 चे पत्र.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मधील १ वस्त्रोद्योग घटकांस १०% भांडवली सवलत वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मधील एकूण १ वस्त्रोद्योग घटकांस एकूण रु.२,०६,४१,०००/- ( अक्षरी रुपये दोन कोटी सहा लक्ष एक्केचाळीस हजार फक्त ) इतकी रक्कम १०% भांडवली सवलतीपोटी मंजूर करुन वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू वस्त्रोद्योग घटकांना वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या बँकांच्या खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली १०% भांडवली सवलतीची रक्कम रु.२,०६,४१,०००/- परिशिष्ट ब मधील बँकेने या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मधील वस्त्रोद्योग घटकांच्या कर्ज खात्यात वितरीत करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती ए .एम. जोशी, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. दा.अं.कुलकर्णी ,उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग

विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन ती उपरोक्त बँकेस वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६५) मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र मधील नवीन वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली अर्थसहाय्य (२८५१ ५९ ९९) दत्तमत ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. वित्त विभाग अर्थसं-२०१५/प्र. क्र. ८५/अर्थ -३ दि .१७ एप्रिल २०१५ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता झाली आहे.

७. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. २५/५/२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार तसेच उपरोक्त शासन निर्णयान्वये वस्त्रोद्योग विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व परि.६ मध्ये नमूद केलेल्या वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार या विभागास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(र. अं.खडसे)**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.(ई-मेलद्वारे)
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.(ई-मेलद्वारे)
उप सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती / कार्यासन -१७ स)
प्रवर्तक, परिशिष्ट अ मधील वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)
परिशिष्ट ब मधील बँका (टफ सेल) (ई-मेल व्दारे)
परिशिष्ट अ मधील वस्त्रोद्योग घटकाच्या स्वतंत्र नस्ती
निवड नस्ती (टेक्स-५)

शासन निर्णय,स.प.व वि. क्रमांक बैठक २०१५/प्र.क्र.१२७/टेक्स-५ , मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- ८ जुलै, २०१५ चे परिशिष्ट-**"अ"**

| | | |
|---|---|---|
| **Sr.No** | : | 1 |
| **Name and Address of unit** | : | GIMATEX INDUSTRIES PVT.LTD. : 7 Km Mile Stone,N.H.No.7,Wani,Hinganghat |
| **Segment of Unit** | : | Independent weaving preparatory, Weaving / Powerloom, Multi-activities (Units with two or more activities simultaneously except composite upgradation mentioned above) |
| **Unit Id** | : | 2014/O/01845 |
| **Date of sanction of term loan under TUF of GOI** | : | 25/03/2013 |
| **Project Cost (Rs. In Lac)** | : | 6817.00 |
| **Amount of loan eligible under TUF (Rs. In Lac)** | : | 2100.00 |
| **Name of Lending Agency** | : | Vijaya Bank( National Bank ) |
| **Name of Nodal Agency** | : | Vijaya Bank( National Bank ) |
| **Date of commencement of production** | : | 18/01/2014 |
| **Amount of claims recommended by the DOT,MS (Rs. in Lac)** | : | 206.41 |
| **Amount of claim approved by the committee (Rs. In Lac)** | : | 206.41 |

-----------------------------------------------------------------------------

शासन निर्णय,स.प.व वि. क्रमांक बैठक २०१५/प्र.क्र.१२७/टेक्स-५ , मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- ८ जुलै, २०१५ चे परिशिष्ट-**"ब"**(बँकांचा तपशिल)

| **Sr.No** | **Bank Name** | **Account Name** | **Account Number** | **IFSC Code** | **Capital Subsidy Amount To Be Disbursed (In Lacs)** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Vijaya Bank | Maharashtra Govt TUFS subsidy RO Mumbai | 507600301000227 | VIJB0005076 | 206.41 |
| | | | | **Total** | **206.41** |